# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०१/१०/२०२४ (मंगळवार)**

---

## पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण,पोलीस भवन येथे सेवानिवृत्त अधिकारी यांचा सत्कार समारंभ

पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण,पोलीस भवन येथे शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांचा सत्कार समारंभ ठेवण्यात आला होता. सदर संमारंभात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण यांच्या हस्ते सेवानिवृत्त झालेले अधिकारी श्रेणी पोउपनि सुभाष चंपतराव धपके नेमणुक दोषसिध्दी सेल, नागपुर ग्रामीण यांचा शाल, श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला असुन. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण यांनी श्रेणी पोउपनि सुभाष चंपतराव धपके यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात श्रेणी पोउपनि सुभाष चंपतराव धपके हे कुटुंबासह हजर होते.

**सदर बातमीचा फोटो सोबत जोडलेला आहे**.



## अवैधरित्या देशी विदेशी, मोहाफुल दारू बाळगणा—या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांनी केली धडाकेबाज कारवाई ५९ आरोपीविरूध्द गुन्हा दाखल एकुण २,७९,०७५/—रू चा मुद्देमाल जप्त

आगामी येणा—या सन उत्सव तसेच निवडणुक दरम्यान काही अनुचित प्रकार घडणार नाही या करीता नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक मा. श्री. हर्ष पोद्दार यांनी नागपुर ग्रामीण यांनी गंभीर दखल घेवुन जिल्हयात दारूबंदी कायदाअंतर्गत मोहीम राबविली असुन सदर मोहीमेदरम्यान नागपुर ग्रामीण जिल्हयाचे विविध पोलीस स्टेशन बेला, एमआयडीसी बोरी, बुट्टीबोरी, वेलतुर, उमरेड, भिवापूर, काटोल, जलालखेडा, नरखेड, अरोली, देवलापार, रामटेक, पारशिवनी, खापरखेडा, मौदा, कळमेश्वर, सावनेर, केळवद, खापा, कोंढाळी, अश्या पोलीस स्टेशन मोहाफुल गावठी दारू गाळणा—यावर छापा टाकुन **एकुण २७९८ लीटर तसेच ४६२ देशी दारू संत्रा भिंगरी, तसेच विदेशी दारूच्या १० बॉटल असे एकुण २,७९,०७५/—रू चा मुद्देमाल जप्त करून ५९ आरोपीतांवर गुन्हे दाखल केले आहे.**

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण आणि सर्व उपविभागीय अधिकारी नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन चे ठाणेदार व त्यांचे स्टॉफनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणा—या आरोपीविरूध्द कारवाई

दिनांक ०१.१०.२०२४ रोजी रामटेक पोलीसांना मा. श्री रमेश बरकते रामटेक विभाग यांनी मौजा शितलवाडी येथे अवैध रेती वाहतुक होत असुन एक टिप्पर क्र एम एच ४० सी.डब्लु ७१७१ रेतीने भरलेला थांबवुन ठेवलेला आहे त्याचेवर कारवाईचे आदेश दिले असता रामटेक येथील कर्मचारी अधिकारी यांनी मौजा शितलवाडी येथे जावुन सदर टिप्पर ची तपासणी केली असता सदर टिप्परमध्ये क्षमतेपेक्षा अधिक रेती असल्याने टिप्पर क्र एम एच ४० सी.डब्लु ७१७१ कि ३५,००,०००/—रु व रेती अंदाजे ८ ब्रास प्रती ३,०००/रु ब्रास प्रमाणे कि २४,०००/रु असे एकुण ३५,२४,०००/रु माल विना रॉयल्टी व खोटी रॉयल्टी रेतीची अवैद्य वाहतुक करतांना मिळुन आल्याने नमुद टिप्पर चालक नामे— **१) आसिफ फिरोज अहमद वय २५ वर्ष रा. ईस्माईलपुरा कामठी २) मोहम्मद जुबेर मो. शरिफ शेख वय ३० वर्ष रा. व्ही व्ही कॉलनी कामठी** यांचेवर पोलीस स्टेशन रामटेक येथे नमुद दोन्ही आरोपीविरूध्द कलम ३०३(२), ३३६(२), ३३६(३), ३४०(२), ४९ भा.न्या.स. सहकलम ४८(७), ४८(८) महा.जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधि सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश बरकते रामटेक विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन रामटेक व त्यांचे स्टाफने पार पाडली.

## रामटेक येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू गाळणा—या इसमांवर धाड
## स्थानिक गुन्हे नागपुर ग्रामीण यांची कारवाई

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ३०/०९/२४ रोजी काचूरवाही ते खोडगाव रोड वरील खदान तलाव काचूरवाही ता. रामटेक येथे मोठया प्रमाणावर अवैध गावठी दारू तयार करून आजुबाजुचे परीसरात विक्री करणार असल्याची गोपनिय खबर स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला मिळाल्याने त्यांनी खदान तलाव काचूरवाही येथील **आरोपी नामे अरविंद हरिदास उर्फ सुदाम धुर्वे रा. काचूरवाही ता. रामटेक** याच्यावर कार्यवाही केली असता त्याचे ताब्यातुन १) ०५ मोठया ड्रममध्ये मोहफूल रसायन सडवा एकूण २००० लीटर किमती ४०,०००/— रू, २) २१०० लीटर मोहाफूल गावठी दारू किमती ५०००/— रू, ३) दारू गाळण्याचे साहीत्य असा एकूण ६१,०००/— रू चा मुददेमाल जप्त करून नाश करण्यात आला आहे. नमुद आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम ६५ (ई) (एफ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास रामटेक पोलीस करत आहेत.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि किशोर शेरकी, पोहवा राजु रेवतकर, अमित मेहेरे, अमोल कुथे, आशिष मुंगळे, पोना विपीन गायधने, देवा देवकते, विरेंद्र नरड यांनी पार पाडली .

## अवैध जनावरांची वाहतुक करणा—या आरोपीतांवर गुन्हा नोंद
## रामटेक पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ३०/०९/२४ चे ०५.४५ ते ०६.०० वा वा दरम्यान रोजी रामटेक पोलीस नाईट पेट्रोलींग करत असतांना पोलीसांना फोनद्वारे माहीती मिळाली बोरी गावात बोरी टोली ते बोरी रोड येथे वाहनातून जनावरांची वाहतूक होत असताना अपघात झालेला आहे, मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळावर पोहचले असता अशोक लेलॅन्ड मालवाहक गाडी MH 36 AA 3622 हे वाहन अपघातग्रस्त स्थितीत होते. सदर वाहनाचा चालक फरार झालेला होता. वाहनाची पाहणी केली असता त्यात १) लाल रंगाच्या २ गायी किमती २०,०००/—रू. २) पांढ—या रंगाच्या ०४ गायी किमती ४०,०००/— रू ३) पांढ—या रंगाचे ०२ कालवड किमती १०,०००/— रू ४) लाल रंगाची एक मृत गाय किमती १०,०००/— रू असे एकूण ०८ जिवंत जनावरे व ०१ मृत जनावरे असे जनावरे बसण्याची आणि चा—याची कोणतीही सोय न करता त्यांना हालचाल करता येणार नाही, अश्या प्रकारे क्रुरपणे कोंबुन ठेवले होते. घटनास्थळावरून खालील मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. **१) लाल रंगाच्या २ गायी किमती २०,०००/—रू. २) पांढ—या रंगाच्या ०४ गायी किमती ४०,०००/— रू ३) पांढ—या रंगाचे ०२ कालवड किमती १०,०००/— रू ४) लाल रंगाची एक मृत गाय किमती १०,०००/— रू असे एकूण ०८ जिवंत जनावरे व ०१ मृत जनावर किमती १०,०००/—५) अशोक लेलॅन्ड माल वाहक गाडी क्र. MH 36 AA 3622 किमंती ५,००,०००/— रूपये असा एकुण किमती ५,८०,०००/— रूपयाचा पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे.** गाडी क्र- MH 36 AA 3622 चा फरार चालकाविरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३२५ भा.न्या.स.सह. प्राणी छाळ अधि.कलम ११ (१) (ड) सहलकम महा. प्राणी सर. अधि. १९४६ चे ५ (अ)(१)(ब)(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास रामटेक पोलीस करीत आहेत.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन रामटेक चे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री आसाराम शेटे, पोहवा शाम रामटेके, पोलीस अंमलदार रामप्रसाद भलावी यांनी पार पाडली.

## अवैधरित्या जुगार खेळणा—या ४ आरोपीतांवर गुन्हा नोंद
## नागपुर ग्रामीण रामटेक पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ३०/०९/२४ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त माहीती मिळाली की, मनसर ता. रामटेक येथे काही इसम अवैधरित्या ५२ तासपत्त्यावर पैशांची बाजी लावुन हारजीत चा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळावर पोहचले असता काही इसत जुगार खेळ खेळतांना मिळुन आले. ४ आरोपीतांना ताब्यात घेवुन त्याचे नाव विचारले असता, आरोपी नामे १)शंकर भगत अंबाडारे २) मनोज सुनिल कोठीकर दोन्ही रा. वार्ड क्र. ०४ मनसर रामटेक ३) वसंता भद्दटा खटमाली रा. पटगोवारी रामटेक ४) राजेश गंगाधर पवार रा. मनसर रामटेक असे सांगितल्यावरून घटनास्थळावरून **मोटर सायकल क्र एम एच ४० ए एक्स १६४२ किंमत २५,०००/— रूपये २) मोटर सायकल क्र एम एच ४० एजी ४०५० किंमत ३०,०००/— रूपयें ३) १३००/—रूपये नगदी ४) ५२ तासपत्ते किंमत ५० रूपयें असा एकूण ५६,६५०/—रू चा माल** पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे. यातील नमुद आरोपीतांवर पोस्टे रामटेक येथे कलम १२ महा.जुगार प्रतिबंध अधि.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास रामटेक पोलीस करीत आहेत.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,मा. रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन रामटेक चे ठाणेदार पोलीस निरीक्षक आसाराम शेटे व त्यांचे अंमलदार यांनी पार पाडली.

## प्राणांतिक अपघात

**पो.स्टे. कुही** :—अंतर्गत मौजा आंबाडी येथे दिनांक २९/०९/२४ चे ०९.३० वा.दरम्यान. यातील आरोपी मृतक नामे— देवानंद नामदेव सुपारे वय ४० वर्ष , रा.माथनी ता.मौदा.जि.नागपुर. यांचे तवेरा चारचाकी वाहन क्र.एम.एच. ०४ ई.एक्स.२०४७ ही भाड्याने करून ब्रम्हपुरी येथील तपाळ वाघोबादेव यांचे देवदर्शन करून गावी माथनी येथे परत जात असता अंदाजे रात्री २१.३० वा. दरम्यान वडोदा मार्गे कुहीकडुन मौदाकडे जात असता **आंबाडी गावाजवळ विरूद्व दिशेने येणाऱ्या वाहनाचे लाईटचा उजेड चालक याचे डोळ्यावर पडल्याने चालक याचे गाडीवरील नियत्रंण सुटल्याने चालकाने वाहनाचा अचानक ब्रेक मारल्याने गाडीची पलटी होवुन अपघात झाला. तेव्हा गाडीतील इतर लोकांना किरकोळ मार लागला असुन मृतक चालक देवानंद नामदेव सुपारे वय ४० वर्ष ,रा.माथनी याचे डोक्याला व डाव्या हाताला मार लागला असल्याने त्याला उपचारा करीता ग्रामिण रूग्णालय कुही येथे नेले असता तेथील डॉ. नी तपासुन मृत घोषीत केले**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— भगवान हरिजी नागपुरे वय ५४ वर्ष,रा.माथनी ता.मौदा.जि.नागपुर. यांच्या रिपोर्टवरून पोस्टे कुही येथे कलम २८१,१२५(ए),१२५(बी.),१०६(१)भा.न्या.सं.२०२३ सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री ओमप्रकाश चिचखेडे पो.स्टे.कुही. मो.नं.९५२७२३१५०५ हे करीत आहे.

## प्राणांतिक अपघात

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत मौजा मारोडी शिवार येथे दिनांक ३०/०९/२४ चे रात्री ००/३० ते ०२/०० वा.दरम्यान एन एच ५३ रोडवर यातील मृतक हा श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन कंपनीतील मौदा साईडवरील चालक हा कंपनीचे मालकीचा **ट्रक क्र. एम.एच. ३६ ए.ए. ६३९९ मौदा येथुन भंडारा येथुन साईडवर राख आणण्यासाठी रात्री १२.३० सुमारास घेवुन जात असतांना त्याने सदर वाहन वेगाने चालविल्यामुळे नियंत्रण सुटून सदर वाहन मुख्य रस्त्यावरून खाली सर्विस रोडवर कोसळुन तो बाहेर पडल्याने वाहनाचे चाक त्याच्या अंगावरुन गेल्याने तो जागीच मरण पावला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे राहुल दादारामजी आखरे वय ३३ वर्षे रा. परतवाडा ता. अचलपुर जि. अमरावती यांच्या रिपोर्टवरून पोस्टे मौदा येथे कलम १०६(१),२८१ बी.एन.एस.,सककलम १८४ मोटर वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास सपोनि अजितसिंग देवरे मो. क ९१९९२१७८१२८९ हे करीत आहे.

## प्राणांतिक अपघात

**पो.स्टे. केळवद** :– दिनांक ३०/०९/२४ चे १०/३० वा. यातील फिर्यादी हे पोलीस पाटील असुन त्यांना फोन आला की भागेमाहेरी बस स्टॉप समोर एक मोटर सायकल एका अज्ञात वाहनाने ठोस मारली असुन मोटर सायकल वरील तिन इसम जखमी अवस्थेत पडुन आहेत. त्यामुळे फिर्यादी हे तात्काळ भागेमाहेरी बस स्टॉप येथे पोहचले असता मोटर सायकल क्र. एम एच ४० सी व्ही ६१५१ ही पांढुर्णा ते सावनेर नॅशनल हायवे क्र. ४७ वर रोडच्या गावाकडील कडेला अपघात झालेल्या स्थितीत पडलेली दिसली एक मुलगा व दोन इसम गंभीर जख्मी अवस्थेत दिसले. तेव्हा फिर्यादीने तात्काळ फोन करून पोलीसांनी माहीती दिली. यातील मृतक नामे – **१) अनिल रमेश इवनाती वय २७ वर्ष रा. परसोडी ता. नरखेड २) शिवाजी परसराम सिरसाम वय ३८ वर्ष ३) ललीत शिवाजी सिरसाम वय १० वर्ष दोन्ही रा. वडंली वाघ ता. काटोल** यांना एका अज्ञात वाहनाने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोरुन धडक मारुन गंभीर जख्मी केले आणि त्यांच्या मृत्युस कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आशुराम दामा शेन्डे वय ४३ वर्ष रा. भागेमाहेरी ता. सावनेर (पोलीस पाटील) यांच्या रिपोर्ट वरून पोस्टे केळवद येथे अज्ञात वाहनाविरूध्द कलम २८१,१२५ (बी), १०६ (१)बी एन एस सहकलम १८४, १३४/१७७ मोटर वाहन कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास सपोनि अनिल राऊत पो स्टे केळवद ठाणेदार मो. नं. ८६६८३८५५७६ हे करीत आहे.

पोलीस माहीती कक्ष
नागपुर ग्रामीण जि नागपुर